# मुंबई महानगरातील अधोविश्व

**श्रीमती. तृप्ती राघवेंद्र सबनीस**
लेखाधिकारी /वित्त विभाग
गुरु नानक खालसा कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स
अँड कॉमर्स, माटुंगा(पूर्व) मुंबई-400 019
ई-मेल - truptisabnis2201@ gmail. Com

---

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खाजगीकरण, उदारीकीकरण आणि जागतिकीकरण या त्रीसूत्रींच्या स्वीकारामुळे औद्योगीकरणास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आणि बाजारपेठेंचा विस्तार होत गेला. रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या. सेवा व वस्तू क्षेत्राचा विकास झाला. तांत्रिक क्षेत्रात फार मोठे बदल झाले. संगणकीकरण वाढले, ई- सेवेचा प्रचार आणि प्रसार झाला. वाढते औद्योगिकीकरण आणि वेगाने होणारी वैज्ञानिक प्रगती इत्यादी गोष्टींच्या परिपाकातून विसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच जगभर 'महानगरे' उदयास आली.

मुंबई शहर म्हणजे हमखास रोजगार मिळण्याचे ठिकाण या भावनेतून झगमगत्या मुंबईच्या आकर्षणापायी आणि झटपट पैसा कमावण्याच्या लोभापाई पारंपारिक व्यवसाय कायमचे बंद करून उपजीविकेसाठी खेड्यापाड्यातील तसेच परप्रांतातील लोकांचे लोंढे मुंबई शहरात येऊ लागले त्यामुळे मुंबई शहरातल्या लोकसंख्येचा विस्फोट होऊन मुंबई शहराचे "महानगरात" रूपांतर झाले. मुंबई महानगर हे महानगरीय जाणिवा आणि संवेदनांचे मुख्य केंद्र बनले.

महानगराच्या या प्रक्रियेमुळे अनेक समस्यांचा जन्म झाला. महानगर हे बहुरंगी, बहुढंगी, बहुआयामी लोकसमूहाचे वास्तव आहे. महानगर म्हणजे, अफाट लोकसंख्या हे समीकरणच तयार झाले. विभिन्न वृत्ती - प्रवृत्तीच्या संस्कृतीच्या संस्कारातून मुंबई महानगराचे स्वतःचे असे एक स्वतंत्र अस्तित्व तयार झाले.

औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण यामुळे महानगरांचा विस्तार होत गेला परंतु महानगराचे भौगोलिक क्षेत्र मात्र मर्यादितच राहिले यात वाढ झाली नाही परिणामी अन्न, वस्त्र, निवारा इत्यादी मूलभूत गरजांचा शासनाकडून हवा तेवढा पुरवठा होऊ शकला नाही या गैरसोयीमुळे झोपडपट्ट्यांची बेसुमार वाढ झाली आणि मुंबई महानगरात बकाल -कंगाल वस्ती वाढत गेली.

मुंबई महानगरात, एका बाजूला पंचतारांकित हॉटेल्स गगनचुंबी इमारती यांचे सिमेंट कॉंक्रीटचे जंगलच तयार झाले तर दुसऱ्या बाजूला झोपडपट्ट्यांचा विस्तार वाढत गेला त्यातूनच महानगरात जगण्याचे विविध स्तर निर्माण झाले. एकीकडे, आर्थिक संपन्नतेचा उपभोग घेणारा श्रीमंत वर्ग तर दुसरीकडे सुरक्षिततेच्या कोशात दडलेला मध्यमवर्ग आणि मूलभूत गरजांपासून वंचित असणारा मजूर कामगार गरीब वर्ग तयार झाला.

यंत्र युगाच्या तंत्र पर्वाची एक वाणिज्य वस्ती मनुष्याचे अवमूल्यन करणारी वसाहत, झोपडपट्ट्या, गलिच्छ बकाल कंगालांची घरे, गुन्हेगारीचे अधोविश्व इत्यादी अनेक गोष्टींनी मुंबई महानगर गजबजले गेले.

विवेचन- मुंबई महानगर यांत्रिकीकरणाच्या विळख्यात सापडल्यामुळे तंत्रज्ञानाच्या मायाजालाचा वापर प्रचंड वाढला आर्थिक उदारीकरण, मुक्त बाजारपेठांचा स्वीकार, वाढता चंगळ वाद, भौतिक सुखांची लालसा इत्यादी अनेक घटकांचा प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष परिणाम मुंबई महानगरीय जीवनशैलीवर होऊ लागला.

महानगरीय जीवनातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक बदलांचे परिणाम तेथील समाज जीवनावर होत असतात आणि महानगरात एक वेगळेच वातावरण तयार होते. एका बाजूला औद्योगीकरणामुळे

झालेले शहरीकरण आणि त्यामुळे झालेली लोकसंख्येची भरमसाठ वाढ आणि दुसऱ्या बाजूला पसरत जाणारी बकाल झोपडपट्टी आणि त्यांचे मूल्य शून्य जीवन व्यवहार, बेकारी,अनैतिकता, गुंडगिरी- गुन्हेगारी, मारामारी, दंगल -दहशत, व्यसनाधीनता- व्याधीग्रस्तताइत्यादींची रेलचेल आणि या चक्रव्यूहात सापडलेल्या अडाणी-अशिक्षित रंजलेल्या गांजलेल्या जीवन रेटणाऱ्या माणसांचे अधोविश्व निर्माण झाले.

सरकारी यंत्रणेच्या अपुऱ्या सोई सुविधामुळे महानगरातील झोपडपट्टीचा विस्तार झाला आणि या बकाल झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसाला बकाल जीवन जगावे लागले . या अधोविश्वातील " अशा लोकांच्या जगण्याला कोणतेच प्रयोजन नसते, कुठलाच दिनक्रम नसतो, ही माणसे दिवसभर कष्ट करून मिळेल ते खात असतात त्यांच्या लेखी जगण्याला आणि मनाला सारखीच किंमत असते त्यांच्या सुखदुःखाचा हिशोब शून्य असतो. या विश्वातील लोकांचे जीवन कंगाल, दारिद्र्य आणि रोगराईने भरलेले असल्यामुळे येथील माणसं अनेक विकृतीने पछाडलेली असतात या अधो विश्वातील लोकांचे जगणे किड्या मुंग्यांसारखे असते येथील माणसे परिस्थितीच्या अनिवार्यतेचे बळी ठरतात. " या अधोविश्वातील माणसांचे जीवन फार कष्टमय असते. प्रशासनाचे दुर्लक्ष, समाजाकडून मिळालेली उपेक्षितता, शिक्षणाचा अभाव, इत्यादी गोष्टींच्या अपूर्णतेमुळे पोटाची खळगी भरण्यासाठी मिळेल ते बेकायदेशीर काम करण्याची वृत्ती बळावत गेली आणि त्यामुळे मुंबई महानगरातील झोपडपट्टीत हातभट्टीची दारू गोळा करणे, अमली पदार्थांची विक्री, स्मगलिंग, तस्करी, जुगार-मटका, वेशाव्यवसाय, असे चोरटे व्यवहार इत्यादी अवैध धंद्याचे माहेरघरच तयार झाले त्यातूनच भांडण -राग, द्वेष-ईर्षा, स्पर्धा,चढाओढ़ आणि दबलेल्या लैंगिक भावभावनांचा उद्रेक होऊन खून मारामारी, दंगल- दहशत, गुंडगिरी यात वाढ होऊ लागली आणि त्यातूनच पुढे अधोविश्वातील 'गुन्हेगारी विश्व' तयार होत गेले. या गुन्हेगारी विश्वात झटपट पैसे मिळण्याचे आकर्षण वाढल्यामुळे स्वतःच्याच चैनीसाठी गैर मार्गाचा अवलंब करताना विकृतीच्या विळख्यात गुरफटत गेलेला तरुण वर्ग आणि त्यातून बिघडत जाणारे मानसिक संतुलन त्यामुळे कुटुंबाकडे झालेले त्याचे दुर्लक्ष, परस्त्रीगमनाची बळावलेली वासनाधवृत्ति, क्षयरोग, एड्स, महारोग....यांसारखे दुर्धर आजार, अवैध तस्करी, वाढलेला भ्रष्टाचार यातून होणारी फसवणूक परिणामता वाढलेली व्यसनाधीनता इत्यादी नकारात्मक गोष्टीमुळे मुंबई महानगरातील अधोविश्वाचे एक अनोखे विश्व तयार होत गेले.

मुंबई महानगराच्या अधोविश्वातील स्त्रियांचे जगणे तर असाह्यतेने ग्रासलेले असते. छानशौकी जगण्याचे वाढते आकर्षण वाढल्यामुळे आणि नैतिक नियमांची पायमल्ली झाल्यामुळे मुंबई महानगरातील तरुण मुले- मुली, स्त्रिया कमी वेळात झटपट पैसा कमावण्याच्या हव्यासापोटी वेश्याव्यवसायाकडे आकर्षित होऊ लागली. प्रत्येक जण या धंद्याकडे स्वच्छेने वळतो असे नाही.काही जणींनी परिस्थितीच्या हतबलतेतून या व्यवसायाचा स्वीकार केलेला असतो तर काहीजणी भौतिक सुखासाठी याचा स्वीकार करतात. कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी तर कधी फसवणूक झाल्यामुळे तर कधी जबरदस्तीने तर कधी दबावामुळे शरीरविक्रय सारखा अप्रतिष्ठित समजला जाणारा मार्ग स्वीकारतात. परिस्थितीच्या रगाड्यात येथील स्त्री भरडली जाते त्यामुळे येथील स्त्रिया, मुलं,- मुली समाजव्यवस्थेचा बळी ठरतात.समाजातील लैंगिक शोषणाला त्यांना सामोरे जावे लागते. येथील स्त्रिया मुली अन्याय अत्याचार सतत निमुटपणे सहन करतात पण त्यांच्या आत्मप्रतिष्ठेला ठेच लागली तर, त्या क्षणात हिंसक देखील होतात. हा व्यवसाय म्हणजे मानवी जीवनाला लागलेला एक कलंक आहे परंतु तो का निर्माण झाला हे समजून घेणे काळाची गरज आहे.मुंबई महानगराच्या अधो विश्वातील समाज हा प्रामुख्याने उपेक्षित समाज आहे. या महानगराच्या अधो विश्वात पिचलेल्या जीवनव्यवस्थेत भरकटलेली, समाजव्यवस्थेत भरडली गेलेली आणि

जगण्याला नैतिक अधिष्ठान नसलेल्या माणसांचे दर्शन घडते. या अधोविश्वातल्या बहुतांश लोकांकडे शिक्षणाचा अभाव असल्यामुळे आणि विविध प्रांतातून 18 पगड जाती-जमातीचे लोक एकत्र आल्यामुळे त्यांची भाषा मराठी हिंदी ख्रिश्चन कन्नड तेलगू बंगाली बिहारी इत्यादी संमिश्र स्वरूपाची असल्यामुळे त्यांच्या भाषेत बहुसांस्कृतीकता आढळते. त्यांच्या बोलीभाषेत बहुदा स्थानिक बोलीचा वापर आढळतो. त्यांच्या भाषेला व्याकरणाचे कोणतेच बंधन उरत नाही.अनेक बोलीतील शब्दांची सरमिसळ आढळते असभ्य अश्लील शिवराळ भाषेचा वापर जास्त आढळतो.

या अधोविश्वातील भाषेला ना कुठली जात -पात,ना कुठले लिंग, ना कुठला धर्म, ना कुठला वर्ग, सर्व पूर्वग्रह दूषित भाषेचे अस्तित्व येथे पहावयास मिळते.

या अधोविश्वातील लोकांना राहण्यासाठी एकच एक घर नसते. लोकांची राहण्याची जागा म्हणजे वस्ती ही बेकायदेशीर असल्यामुळे बहुधा ते गटाराच्या कडेला, डोंगरकपारीत, एखाद्या निर्जन ओसाड जागी, खाडीच्या बाजूला अस्वच्छ जागेत, रेल्वेच्या बाजूला तर कधी फुटपाथवर देखील वास्तव्य करताना दिसतात. त्यांच्या या स्थलांतरामुळे होणारे सामाजिक दुष्परिणाम स्वीकारून ते दिशाहीन जीवन जगत असतात. त्यांच्या राहणीमानात असलेला गलिच्छपणा भंगणपणा कंगालपणा यामुळे त्यांच्या वस्तीत एक प्रकारची नकारात्मक वातावरण निर्मिती होताना दिसते. येथे उपेक्षितांच्या वास्तववादी जीवनाचा समूहनिष्ठ अविष्कार पाहायला मिळतो .

या अधोविश्वातील माणसांच्या राहण्यात खाण्या-पिण्यात, वागण्यात एकसंधता नसल्यामुळे हे लोक महानगरात राहून देखील रिती- रिवाज, संस्कृती या कल्पनेला छेद देतात परंतु या लोकांनी स्वतःसाठी तयार केलेल्या त्यांच्या काही रीती- कल्पना असतात. मुंबई महानगराच्या अधो विश्वातील लोकांच्या वारंवार घडणाऱ्या स्थलांतरामुळे होणारे सामाजिक दुष्परिणाम स्वीकारून ते दिशाहीन जगत असतात." या विश्वातील माणसांच्या जीवनाला कसलाच आधार नाही माणसांच्या मूलभूत गरजा पुऱ्या होण्यापूर्वी त्या येथे पिळवटून विकृत होतात आणि सफल सुंदर जीवनाची स्वप्ने प्रत्यक्षात येण्यापूर्वीच त्यांचा चक्काचूर होतो. " आणि त्यांचा जगण्याशी संघर्ष सुरू होतो. वर्तमानाशी भूतकाळाचे कोणतेच नाते प्रस्थापित न करता जगणारी ही माणसे आहेत. भूतकाळाने ह्या माणसांना झटकून टाकलेले असते तसाच भविष्यकाळ त्यांना स्वतःशी लगट करू देत नाही तो, या माणसांची सारी आशावादी स्वप्ने पुन्हा नाकारीत असतो, हातावर पोट असणारा फार मोठा वर्ग ह्या अधोविश्वात राहत असलेला दिसतो. जीवनात स्थैर्य नसलेल्या माणसांचे अधांतर येथे पहा पाहायला मिळते येथील लोकांच्या जीवनाला स्थैर्य लाभलेले नसते नैसर्गिक घटनांचे चक्र सुद्धा परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडून केव्हा बंद पडेल याची शाश्वती या लोकांना नसते. या व्यक्तींच्या जीवनात लक्षणीय असे काहीच घडत नाही. या माणसांची जीवनमूल्ये पांढरपेशा समाजाच्या जीवन मूल्यांपेक्षा वेगळी आहेत त्यांचे जीवन जगण्याचे आणि उपभोगण्याचे सर्व मार्ग शिष्टसमंत नाहीत. अशा व्यक्तींचे जीवनदर्शन या अधोविश्वात घडते. या अधो विश्वातील माणसे त्यांचे आनंदाचे आणि दुःखाचे क्षण देखील दारू पिऊनच साजरे करतात सुखदुःखाच्या क्षणी पुरुषांबरोबर बायकाही दारू पिताना दिसतात. महिलांनी दारू पिणे हा या अधोविश्वातील सामाजिक प्रभात आहे.

मुंबई महानगरातल्या अधो विश्वातील उपेक्षितांच्या मांदियाळी जीवन वास्तवाचे अनेक पदर कित्येक कवी- कवयित्री,लेखक यांनी शब्दबद्ध केलेले आढळते.

मुंबई महानगरातील अधोविश्व हे निराशा, कोंडमारा, घुसमट, जगण्यातील मूल्यहीन अर्थशून्यता, वीरूपता आणि विद्रुपता आदी गोष्टीमुळे जगण्याच्या वास्तवात निर्माण झालेली भयानकता या व्यामिश्रतेने भरलेले आहे.

समाजातील स्वार्थी उच्चभ्रू लोकांनी केलेली गरिबांची उपेक्षा आणि प्रशासनाने दिन-दलितांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष केल्यामुळे महानगरातल्या झोपडपट्टीत बेसुमार वाढ होऊ लागली, त्यामुळे महानगराचे अधोविश्व वाढीस लागलेले दिसते.

**निष्कर्ष :**

मुंबई महानगराच्या अधोविश्वातील अपुऱ्या पायाभूत सोयीसुविधा मुळे वाढलेली झोपडपट्ट्यांची दाटीवाटी, बकालपणाचे दारिद्रय, शिक्षणाच्या अभावामुळे वाढलेली व्यसनाधीनता, वाढत्या गरजा, वाढती महागाई, अन्याय दबावाला बळी पडणारी माणसे, जीव घेणे स्पर्धा, पैशाला अवास्तव महत्व, गुंडगिरी- गुन्हेगारीला मिळणारा राजकीय वरदहस्त, सत्तेचे राजकारण आणि त्यांचे डावपेच, पोलीस यंत्रणेचा आश्रय, कठोर शिक्षेचा अभाव, शासनाचे दुर्लक्ष इत्यादी कारणामुळे मुंबई महानगरात विस्थापित होऊन पसरत चाललेले 'अधोविश्व' हे मुंबई महानगराचे एक व्यावच्छेदक लक्षण ठरले आहे.

एकूणच मुंबई महानगराच्या अधोविश्वातील माणसांचा प्रवास काटेरी बोचरा आहे. अंतर्मन व्याकुळ करणारा आहे. आणि म्हणूनच येथील लोकांच्या खडतर जीवन प्रवासाकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक लक्ष पुरविल्यास मुंबई महानगराच्या अधोविश्वातील जनजीवन नक्कीच सुखकर निरामय होईल हे निश्चित!

**संदर्भसूची** :


- दळवी जयवंत - चक्र कादंबरी, मॅजेस्टिक पब्लिकेशन 1963
- पाध्ये भाऊ - राडा कादंबरी, शब्द पब्लिकेशन मुंबई -2014
- पाध्ये भाऊ - वणवा कादंबरी, इंद्रनील प्रकाशन मुंबई -1978
- किणीकर अनिल यांनी संपादित केलेल्या 1988 च्या दिवाळी अंकातील लेख (संगणकावरून)
- माणगावे नीलम - शोध कादंबरी, सुकृत प्रकाशन सांगली- 2005


Research Hub International Journal